21 JUL 2024 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रत्येक संस्थेसाठी चतुर्थश्रेणी कर्मचारी हाच ब्रँड ॲम्बॅसिडर असतो

## पुणे येथील लाईफ व सॉफ्ट स्कील प्रशिक्षक मेधा जेरे

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिक्षणासह कोणत्याही संस्थेचा, आस्थापनेचा चतुर्थश्रेणी कर्मचारी ब्रँड ॲम्बॅसिडर (सदिच्छादूत) असतो, ही बाब प्रत्येकाने लक्षात ठेवून सेवातत्पर राहायला हवे, असे प्रतिपादन पुणे येथील लाइफ ॲण्ड सॉफ्ट स्कील प्रशिक्षक मेधा जेरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे बँक ऑफ इंडिया अध्यासन, गुरूवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र आणि कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील आयोजित प्रशिक्षण शिबिरात त्या बोलत होत्या. 'नागरी सहकारी बँकांमधील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांमधील कार्यनैतिकता' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

जेरे म्हणाल्या, कर्मचारी कोणत्याही श्रेणीचा असला तरी त्याने आपल्या कामावर निर्व्याज आणि निस्वार्थ प्रेम केले पाहिजे. आपले कामच आपल्याला समाजात ओळख प्राप्त करून देते. त्यामुळे काम करीत असताना कर्मचारी म्हणून नव्हे तर संस्थेचे भागीदार



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना पुण्याच्या लाईफ ॲन्ड सॉफ्ट स्कील प्रशिक्षक मेधा जेरे.

म्हणून करा. ग्राहक आपल्या आस्थापनेतून जाताना सोबत येथील अनुभव घेऊन जात असतो. विशेषत: बँकिंग क्षेत्रात येणाऱ्या ग्राहकाची पहिली भेट ही चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याशीच होते. त्यामुळे त्याला आपण मनापासून सेवा दिली, त्याच्याशी योग्य सुसंवाद साधला, तर तो कर्मचारी आणि त्याची संस्था या दोघांनाही ग्राहकाच्या हृदयात स्थान मिळते. त्या अर्थाने चतुर्थश्रेणी कर्मचारी हा संस्थेचा ब्रॅन्ड ॲम्बॅसिडर असतो, ही बाब या कर्मचाऱ्यांसह सर्वच घटकांनी लक्षात घेणे गरजेचे आहे.

कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी नवनवे ज्ञान आत्मसात करण्यास प्राधान्य द्यावे, कृत्रिम बुद्धिमत्तेचे आव्हान सामोरे असताना आपल्या कामाशी, ग्राहकांशी भावनिकदृष्ट्या नाते जोडावे, असे आवाहनही त्यांनी केले.

अध्यक्षस्थानावरून कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, शिक्षणाचे उपयोजन दैनंदिन कामकाजामध्ये प्रभावीपणे करावे. आपल्या भोवतालाच्या आणि विशेषत: कार्यस्थळाच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांच्या मनात आपुलकीची भावना आणि जाणीवा असणे महत्त्वाचे असते. एखादी संस्था केवळ आपल्याला नोकरी, पगार देत नाही, तर त्यासोबत एक सामाजिक प्रतिष्ठाही प्रदान करीत असते. ही प्रतिष्ठा जपण्याबरोबरच ती वृद्धिंगत करण्याची जबाबदारीही कर्मचाऱ्यांनी घेतली पाहिजे.

अध्यासनाचे डॉ. राजन पडवळ यांनी स्वागत व परिचय करून दिला. कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल नागराळे यांनी प्रास्ताविक केले. दिवसभरात तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. नागरी सहकारी बँकांतील चतुर्थश्रेणी कर्मचारी मोठ्या संख्येने कार्यशाळेस उपस्थित होते.

21 JUL 2024
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोणत्याही संस्थेचा चतुर्थश्रेणी कर्मचारी ब्रँड ॲम्बॅसिडर : जेरे

## विद्यापीठात एकदिवसीय व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोणत्याही संस्थेचा, आस्थापनेचा चतुर्थश्रेणी कर्मचारी हा ब्रँड ॲम्बॅसिडर (सदिच्छादूत) असतो. ही बाब प्रत्येकाने लक्षात ठेवून सेवातत्पर राहायला हवे, असे मार्गदर्शन पुणे येथील लाईफ व सॉफ्ट स्कील प्रशिक्षक मेधा जेरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे बँक ऑफ इंडिया अध्यासन, गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र आणि कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'नागरी सहकारी बँकांमधील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांमधील कार्य नैतिकता' विषयावर एकदिवसीय व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. जेरे



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मेधा जेरे.**

म्हणाल्या, कर्मचारी कोणत्याही श्रेणीचा असला, तरी त्याने कामावर निर्व्याज व निस्वार्थ प्रेम केले पाहिजे. कर्मनिष्ठा ही महत्त्वाची मानली पाहिजे. कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी नवनवे ज्ञान आत्मसात करण्यास प्राधान्य द्यावे व कृत्रिम बुद्धिमत्तेचे आव्हान सामोरे असताना आपल्या कामाशी, ग्राहकांशी भावनिकदृष्ट्या नाते जोडावे.

अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, एखादी संस्था केवळ आपल्याला नोकरी, पगार देत नाही, तर त्यासोबत एक सामाजिक प्रतिष्ठाही प्रदान करीत असते. ही प्रतिष्ठा जपण्याबरोबरच ती वृद्धिंगत करण्याची जबाबदारी कर्मचाऱ्यांनी घेतली पाहिजे.

अध्यासनाचे डॉ. राजन पडवळ यांनी स्वागत केले. कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल नागराळे यांनी प्रास्ताविक केले. दिवसभरात तज्ज्ञ मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JUL 2024
लोकमत

# चतुर्थश्रेणी कर्मचारी हाच संस्थेचा खरा ब्रँड ॲम्बॅसडर : जेरे

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोणत्याही संस्थेचा, आस्थापनेचा चतुर्थश्रेणी कर्मचारी हाच ब्रँड ॲम्बॅसडर असतो, ही बाब लक्षात ठेवून सेवातत्पर राहायला हवे, असे मत पुणे येथील लाइफ व सॉफ्ट स्किल प्रशिक्षक मेधा जेरे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाचे बँक ऑफ इंडिया अध्यासन, गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र आणि कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशनतर्फे 'नागरी सहकारी बँकांमधील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांमधील कार्यनैतिकता' या विषयावर व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते. ते म्हणाले, शिक्षणाचे उपयोजन कामकाजामध्ये प्रभावी पद्धतीने कसे करावे, यासाठी अशा उपक्रमांची गरज आहे. डॉ. राजन पडवळ यांनी स्वागत केले. अनिल नागराळे यांनी प्रास्ताविक केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JUL 2024
लोकमत

# 'स्कोपस निम्बस'वर उद्या कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग यांच्यावतीने सोमवारी (दि. २२) सकाळी १०:३० वाजता राजर्षी शाहू सिनेट हॉलमध्ये 'अवेअरनेस प्रोग्राम ऑन स्कोपस अ‍ॅण्ड निम्बस' या विषयावर कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेत गिरीश कुलकर्णी हे 'निम्बस' या वेब स्केल डिस्कवरी सेवेविषयी व ऐश्वर्या नायल या 'स्कोपस'या डेटाबेस विषयी मार्गदर्शन करतील. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील.

21 JUL 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात उद्या कार्यशाळेचे आयोजन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि.२२ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता राजर्षी शाहू सिनेट हॉल येथे 'अवेअरनेस प्रोग्राम ऑन स्कोपस, अँड निम्बस' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

शिवाजी विद्यापीठातील सर्व शिक्षक व पीएच. डी. नोंदणी केलेले सर्व संशोधकासाठी कार्यक्रम आयोजित केला आहे.

कार्यशाळेमध्ये गिरीश कुलकर्णी हे 'निम्बस' या वेब स्केल डिस्कवरी सेवेविषयी व ऐश्वर्या नायल, एल्सवियर, नवी दिल्ली 'स्कोपस'या डेटाबेसविषयी तज्ज्ञ व्याख्यान देणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

संशोधक, विद्यार्थी व प्राध्यापकांनी कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. धनंजय सुतार, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JUL 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात दूरशिक्षण एमबीएची आज फेरपरीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने एमबीएच्या (डिस्टन्स) प्रवेशासाठीची फेरपरीक्षा रविवारी (दि. २१) होणार आहे. विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता एमबीए (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी आवश्यक असणाऱ्या प्रवेश परीक्षेसाठी रिक्त जागांकरिता अर्ज प्रक्रिया पूर्ण झाली आहे. रिक्त जागांसाठी प्रवेश परीक्षा घेतली जात आहे. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र हे परीक्षा केंद्र असून सुमारे १५० विद्यार्थी परीक्षा देणार असल्याचे समजते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JUL 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे ७३१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर ७३१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. निकालाची सरासरी ९.४८ आहे. विद्यापीठ पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. शनिवारी बॅचलर ऑफ लॉ (स्पेशल), मास्टर ऑफ फार्मसी, बॅचलर ऑफ लॉ (पाच वर्षे) आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. परीक्षेला ११६७ विद्यार्थी बसले. त्यापैकी २१९ विद्यार्थी अनुपस्थित होते. दि. २० रोजी बॅचलर ऑफ फार्मसी, मास्टर ऑफ आर्किटेक्चर अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

जनसंपर्क कक्ष
21 JUL 2024
सकाळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बी. फार्मसीचे निकाल जाहीर

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन विभागातर्फे बी. फार्मसी सेमिस्टर १, २, ३, ४ व ५, मास्टर इन आर्किटेक्टच्या सेमिस्टर तीनचे निकाल शनिवारी जाहीर झाले. आजअखेर ७३१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. मार्च/एप्रिल-२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा २१ मार्च २०२४ पासून सुरळीतपणे सुरू आहेत. बॅचलर ऑफ लॉ (स्पेशल), मास्टर ऑफ फार्मसी, बॅचलर ऑफ लॉ (फाइव्ह इयर) व बॅचलर ऑफ फार्मसी अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालयांत झाल्या. परीक्षांसाठी १९६७ विद्यार्थ्यांपैकी २१९ विद्यार्थी अनुपस्थित होते. विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. दरम्यान, आज कोणत्याही गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे झाली नाही.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JUL 2024
सकाळ

# विद्यापीठांतर्गत ७३१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल-२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. आत्तापर्यंत ७३१ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर झाले. शनिवारी चार अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी १ हजार ९६७ पैकी १ हजार ७४७ विद्यार्थी उपस्थित होते. भरारी पथकाकडून तिन्ही जिल्ह्यातून एकही गैरप्रकार उघडकीस आलेला नाही. तरी विद्यार्थ्यांनी नियमांच्या अधीन राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालकांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JUL 2024
पुढारी




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुणवत्ता शिष्यवृत्तीत प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांचा सत्कार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला.

# शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये न्यू कॉलेज प्रथम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये न्यू कॉलेजने बाजी मारली आहे. मानव विज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन अशा दोन विद्याशाखांमध्ये शहरी विभागामध्ये प्रथम क्रमांक मिळवला. ३७ विद्यार्थ्यांनी विद्यापीठाची शिष्यवृत्ती मिळवून शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्तीच्या यादीमध्ये अव्वल स्थान कायम ठेवले आहे.

प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांचा शिवाजी विद्यापीठामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक डॉ अभयसिंह जाधव उपस्थित होते. महाविद्यालयामध्ये गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ झाला. संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.